## <u>महाराष्ट्र शासन</u>

**क्रमांक :** संकीर्ण-२०२०/(प्र. क्र. १५/२०)/नोंदणी शाखा,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : २२.१२.२०२०.

### (Tender Notice)
### दरपत्रकाबाबतच्या सूचना

उच्च व तंत्र शिक्षण विभाग (खुद्द), मंत्रालय, मुंबई या विभागाच्या कार्यालयीन वापरासाठी लागणाऱ्या खालील तक्त्यात नमुद केलेल्या मॉडेलच्या रिसायकलिंग टोनरचा दि. ०१.०१.२०२१ ते दि. ३१.१२.२०२१ या एक वर्षाच्या कालावधीसाठी पुरवठा करण्याकरिता मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. पुढे उद्धृत करण्यात आलेल्या दरपत्रकाच्या अटी व शर्ती विचारात घेऊन टोनर रिसायकलिंग करुन पुरविण्याबाबतची दरपत्रके दि.३१.१२.२०२० रोजी दु. ०३.३० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात उप सचिव (नोंदणी शाखा), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ४ था मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांचे नावे पाठविण्यात यावीत.

२. याबाबतच्या अटी व शर्तींचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

I. दि.०१.०१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१ या कालावधीकरीता खालील संगणक प्रिंटर टोनर रिसायकलिंग करण्याकरिता करार करावा लागेल.

| अ. क्र. | टोनर क्रमांक |
|---|---|
| १ | HP १२A, ८८ A, ३६ A |
| २ | Canon ३३७ |
| ३ | Samsung १११ S |

II. एका पुरवठादारास एकच निविदा सादर करता येईल.

III. निविदाकारांकडून त्यांची दरपत्रके दि. ३१.१२.२०२० रोजी दु. ०३.३० वाजेपर्यंत मोहोरबंद लिफाफ्यात उप सचिव (नोंदणी शाखा), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ४ था मजला, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांचे नावे पाठविण्यात यावीत. त्यानंतर आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

IV. मोहोरबंद लिफाफ्यावर **"रिसायकलिंग टोनरचा पुरवठा करण्याबाबत दरपत्रक"** असे लिहिणे आवश्यक आहे. या लिफाफ्यामध्ये भाग-१ "तांत्रिक" व भाग-२ "अतांत्रिक" असे दोन स्वतंत्र बंद लिफाफे तशा स्पष्ट उल्लेखासह ठेवावेत. अशाप्रकारे दोन-लिफाफा पध्दतीने दरपत्रक सादर करावे अन्यथा दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही.

V. दरपत्रक फॉर्म्सवर दरपत्रक धारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक राहील.

VI. प्राप्त दरपत्रक उघडण्याची तारीख व वेळ आपण नमूद केलेल्या E-mail पत्त्यावर कळविण्यात येईल. त्यासाठी लिफाफ्यावर E-mail पत्ता स्पष्टपणे नमूद करावा. याबाबतची जबाबदारी निविदाकाराची राहील. दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडते वेळी दरपत्रकधारक स्वत: किंवा त्याचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल.

VII. निविदा स्वीकृत होऊन पुरवठा आदेश निर्गमित केल्यांनतर मागणी करण्यात येणाऱ्या रिसायकलींग टोनरचा पुरवठा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे तात्काळ व स्वीकृत दरपत्रकानुसार करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील.

VIII. रिसायकलिंग टोनरचा पुरवठा केल्यानंतर दरमहा मुद्रांक पावतीसहीत देयके सादर करावीत. देयकाची रक्कम ECS द्वारे जमा करण्यासाठी बँक खात्याचा सविस्तर तपशिल सादर करणे आवश्यक राहील. परीपूर्ण देयके सादर करण्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील. तसेच, प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास त्यावर विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

IX. कोणतेही १ अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, निविदा प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्वीकृतीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा तसेच दिलेले कार्यादेश रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवत आहे.

X. दरपत्रक स्वीकृत केल्यानंतर रु. १०,०००/- (रु. दहा हजार फक्त) इतक्या रकमेचे बँक हमीपत्र द्यावे लागेल.

XI. संगणक प्रिंटरच्या रिसायकलिंग टोनरबाबत पुढील बाबीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

a. रिसायकलिंग टोनर पुरवण्याबाबत Standardized Test Method Committee कडील प्रमाणपत्र सादर करावे.
b. टोनरच्या आतील भाग ड्रम, पीसीआर, वेब रोलर, वायपर ब्लेड, डॉक्टर ब्लेड हे प्रत्येक रिसायकलिंग टोनर मध्ये वापरण्यात येतील.
c. रिसायकलिंग टोनरमध्ये ब्रँडेड पावडर मशिनद्वारे भरण्यात येईल.
d. रिसायकलिंग टोनर मधून प्रिंट होणाऱ्या प्रतीची संख्या मूळ टोनर मधून प्रिंट होणाऱ्या प्रतीच्या ९० टक्के पेक्षा अधिक असेल.
e. प्रिंटीगचा दर्जा उत्तम असेल.
f. रिसायकलिंग टोनर वापरामुळे विभागास नविन टोनर खरेदी करण्याची आवश्यकता पडणार नाही.
g. विभागाच्या मागणीनुसार रिसायकलिंग टोनर तात्काळ पुरविण्यात यावे.
h. रिसायकलिंग टोनर मध्ये काही दोष आढळून आल्यास पुरवठादाराकडून टोनर नि:शुल्क व तात्काळ बदलून देण्यात येईल.
i. सदोष टोनरमुळे प्रिंटर ना दुरुस्त झाल्यास प्रिंटर दुरुस्तीचा खर्च पुरवठादाराच्या देयकामधून कपात करण्यात येईल/प्रिंटर पुरवठादाराकडून दुरुस्त करुन घेण्यात येईल.

j. करार कालावधीमध्ये रिसायकलिंग ऐवजी रिफीलिंग टोनर पुरवठा केल्याचे निष्पन्न झाल्यास पुरवठादार कंपनीस सुयोग्य दंड आकरण्याचे व शिक्षा करण्याचे अधिकार शासनास असतील.

३. वरील “a” ते “j” बाबींची पूर्तता न झाल्यास पुरवठादार योग्य त्या कार्यवाहीस पात्र असेल व त्यास काळ्या यादीत टाकले जाईल.

४. सदर रिसायकलिंग मशिन कार्यपध्दतीबाबत परिरक्षण केल्याबाबत Standardized Test Method Committee कडील प्रमाणपत्र सादर करावे.

५. उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे भाग-१ “तांत्रिक” दरपत्रक फॉर्म “अ” मध्ये नमूद असेल तरच निविदाकराच्या दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

DATTATRAYA RAMBHAU KAHAR

Digitally signed by DATTATRAYA RAMBHAU KAHAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER & TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=44c81ed7c5650383de2d3bd4939feb17be94c77ddf9380bfe3d4af1d10cfd393, serialNumber=6c5292c043ebba90984d77378c6e4fb506d9694e3e8f08dd386c5d3f42e79b10, cn=DATTATRAYA RAMBHAU KAHAR
Date: 2020.12.29 14:56:06 +05'30'

**( द. रा. कहार )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**४२०, विस्तार इमारत, मंत्रालय,**
**मुंबई - ४०० ०३२.**
**दूरध्वनी क्र. : ०२२-२२०२५२८१.**

**उच्च व तंत्रशिक्षण विभागात दि.०१.०१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१ या एक वर्षाच्या कालावधीसाठी लागणाऱ्या टोनर रिसायकलींगचा पुरवठा करण्याबाबत निविदा मागविण्याचा कार्यक्रम :**

| अ.क्र. | तपशील | दिनांक व वेळ |
| --- | --- | --- |
| १ | निविदा प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि. २२.१२.२०२० |
| २ | निविदा सादर करावयाचा कालावधी | दि. २२.१२.२०२० ते दि. ३१.१२.२०२० |
| ३ | निविदा भरुन सादर करण्याचा अंतिम दिनांक | दि. ३१.१२. २०२० (दुपारी ०३.३० पर्यंत) |
| ४ | निविदा उघडण्याचा दिनांक | दि. ०१.०१.२०२१ दुपारी ०३.०० वाजता |
| ५ | निविदा भरण्यासाठी व निविदा भरताना येणाऱ्या अडचणीसाठी टोल फ्री संपर्क दूरध्वनी क्रमांक | १८०० ३०७० २२३२ व ७८७८१०७९८५/८६ |

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

नोंदणी शाखा,४ था मजला, विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दुरध्वनी क्र. ०२२-२२०२५२८१.

**उच्च व तंत्रशिक्षण विभागात दि.०१.०१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१ या एक वर्षाच्या कालावधीसाठी लागणाऱ्या टोनर रिसायकलींगचा पुरवठा करण्याबाबत निविदा**
**निविदा मागविण्याचा कार्यक्रम :**

**भाग-१ : तांत्रिक दरपत्रक (फॉर्म-अ)**

१. पुरवठादाराचे /संस्थेचे नाव :
२. संपूर्ण पत्ता/कार्यालय :
३. दूरध्वनी (कार्यालय) :
मोबाईल क्रमांक :
फॅक्स :
ई-मेल :
४. निविदा प्रपत्र भरुन देण्याचा अंतिम दिनांक : दि.३१.१२.२०२० रोजी दु.३.३० वाजेपर्यत.
५. आयकर नोंदणी क्रमांक (पॅन) :
६. वस्तू व सेवा कर (GST) क्रमांक : प्रमाणपत्र देणारे कार्यालय
: प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक
: वैधतेची मुदत
७. व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या विविध नोंदण्या :
दुकाने व संस्था अधिनियम १९४८ : प्रमाणपत्र देणारे कार्यालय........
: प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक.......
: वैधतेची मुदत............
८. रिसायकलिंग टोनर पुरवण्याबाबत Standardized Test Method Committee कडील प्रमाणपत्र सादर करावे.
९. दरपत्रकाच्या सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

**दिनांक** :

**स्थळ** : **निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का**

(**सूचना** : दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, गिरवणे (ओव्हररायटिंग), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करणे आवश्यक असल्यास त्या ठीकाणी पूर्ण स्वाक्षरी करावी, तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.)

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

नोंदणी शाखा,४ था मजला, विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दुरध्वनी क्र. ०२२-२२०२५२८१.

**उच्च व तंत्रशिक्षण विभागात दि.०१.०१.२०२१ ते दि.३१.१२.२०२१ या एक वर्षाच्या कालावधीसाठी लागणाऱ्या टोनर रिसायकलींगचा पुरवठा करण्याबाबत निविदा**

**भाग-२ : अतांत्रिक दरपत्रक (फॉर्म-ब)**

१. पुरवठादाराचे पूर्ण नाव :
२. पत्रव्यवहाराचा पत्ता :
३. दूरध्वनी (कार्यालय) : (अ) कार्यालय :
(ब) मोबाईल :
४. ई-मेल :

| अ.क्र. | टोनर क्रमांक |
|---|---|
| १ | HP १२A, ८८ A, ३६ A |
| २ | Canon ३३७ |
| ३ | Samsung १११ S |

**दिनांक** :

**स्थळ : मुंबई** **निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का**

(**सूचना** : दरामध्ये तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड, गिरवणे (ओव्हररायटिंग), पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करणे आवश्यक असल्यास त्या ठिकाणी पूर्ण स्वाक्षरी करावी, तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.)